दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com

संपादक : अजय भांगे

https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | रविवार दि.२६ एप्रिल २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक २३७ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Sunday 26 April 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 237 | Pages 4 | Rate 4 Rs

## महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेसाठी रविवारी मतदान

**मुंबई**–महाराष्ट्र वैद्यकिय परिषदेच्या निवडणुकीसाठी रविवारी ता. २६ राज्यात मतदान होणार असून राज्यातील १.२३ लाख वैद्यकिय व्यवसायीक मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत.महाराष्ट्र वैद्यकिय परिषदेची निवडणुक प्रक्रिया सुरु असून यामध्ये ९ जागांसाठी ६० उमेदवार निवडणुक रिंगणात आहेत. राज्यातील वैद्यकिय व्यवसायांची शिखर परिषध असलेल्या या परिषदेवर सत्ता मिळविण्यासाठी वैद्यकिय व्यवासायीकांच्या विविध संघटना सरसावल्या असून या संघटनांकडून राजकिय पाठबळ देखील मिळण्याच्या हालचाली सुरु आहेत. त्यानुसार काही ठिकाणी राजकिय पक्षाच्या बैठका होत असल्याचे चित्र आहे.दरम्यान, या परिषदेच्या ९ जागांसाठी साठ उमेदवार निवडणुक रिंगणात आहेत. या परिषदेसाठी रविवारी ता. २५ सकाळी आठ ते सायंकाळी पाच यावेळेत मतदान होणार आहे. राज्यातील वैद्यकिय व्यावसायीक मतदान करणार असून यामध्ये राज्यातील सुमारे १.२३ लाख वैद्यकिय व्यवसायीक मतदान करणार आहेत.

# गोदा ते नर्मदा जलयात्रेचा मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत दिमाखदार शुभारंभ

## जलसंवर्धनाचा जागर करत अहिल्यादेवींना अनोखी मानवंदना

### नदीजोड प्रकल्पच्या माध्यमातून राज्य दुष्काळमुक्त करणार–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### गोदावरी निर्मळ आणि अविरल करण्याची मुख्यमंत्र्यांची ग्वाही

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जन्मोत्सवाचे औचित्य साधून महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागामार्फत आयोजित करण्यात आलेल्या 'गोदा ते नर्मदा' जलयात्रेचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे भव्य शुभारंभ झाला. नदी जोड प्रकल्पाच्या माध्यमातून राज्याला दुष्काळमुक्त करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून येत्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या निमित्ताने निर्मळ आणि अविरल गोदावरीसाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.अहिल्यादेवींचे विचार, वारसा आणि विकास हा त्रिसूत्री मंत्र घेऊन ही यात्रा सुरू झाली आहे. कार्यक्रमाला राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, इंदूर संस्थानचे श्रीमंत युवराज महाराज यशवंतराव होळकर, अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठाचे पीठाधीश परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे, नाशिकच्या महापौर हिमगौरी आडके, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर आदी उपस्थित होते.**

दैनिक वादळ वार्ता
नाशिक। प्रतिनिधी

मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, वेदात नदीचे महात्म्य वर्णन केले असून नदीला आई मानले आहे. नदी स्तुतीसुक्तात ऋषींमुनींनी नदीच्या उपयुक्ततेचे वर्णन केले आहे. वारशाचे संवर्धन आणि विकास याचा समन्वय देशाच्या उज्वल भवितव्यासाठी आवश्यक आहे. म्हणूनच अहिल्यादेवींच्या विचाराच्या आधारे भविष्यातील विकासाची दिशा दाखविण्यासाठी या यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. गोदावरी नदी महाराष्ट्रासह आंध्रप्रदेशासाठी महत्वाची असल्याने ती बारमाही प्रवाहित राहावी यासाठीदेखील प्रयत्न सुरू आहेत, असे त्यांनी सांगितले..



### जलयात्रेचा प्रवास असा राहील

- २५ एप्रिल: त्र्यंबकेश्वर ते संगमनेर (मुक्काम: संगमनेर)
- २६ एप्रिल: संगमनेरमार्गे शिर्डी (मुक्काम: शिर्डी).
- २७ एप्रिल: कोपरगाव, वैजापूर, संभाजीनगर, घृष्णेश्वर (मुक्काम: घृष्णेश्वर).
- २८ एप्रिल: कन्नड, चाळीसगाव, धुळे (मुक्काम: धुळे).
- २९ एप्रिल: धुळे ते महेश्वर, मध्य प्रदेश (समारोप).

मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या जलव्यवस्थापनातील योगदानाचे स्मरण केले. ते म्हणाले, अहिल्यादेवी होळकर यांनी घाट, बारव यांची निर्मिती करतांना अध्यात्मिकता आणि उपयुक्तता याचा समन्वय साधला. पाण्याचे महत्व लक्षात घेऊन जलव्यवस्थापनावर भर दिला. त्यांनी निर्माण केलेले बारव आजही सुस्थितीत असून त्याचे संवर्धन राज्य शासन करेल, अशी ग्वाही त्यांनी दिली. अहिल्यादेवी होळकर यांनी नद्यांचे महत्व जाणले आणि नदी प्रदूषण रोखण्याचे प्रयत्न केले. महिला, गरीब आदिवासीना समाजाच्या मुख्य धारेत आणण्याचे कार्य त्यांनी केले. त्यांचे विचार आजही महत्वाचे आणि मार्गदर्शक असून छत्रपती शिवाजी महाराज आणि अहिल्यादेवी यांच्यासारख्या महान व्यक्तींच्या विचारांच्या आधारेच शाश्वत विकास साधता येईल, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

मंत्री श्री. विखे पाटील म्हणाले, त्र्यंबकेश्वर आणि चौंडी येथून दोन यात्रा सुरू होत असून मध्य प्रदेशातील माहेश्वर येथे नर्मदातीरी समारोप होणार आहे. राज्यातील ३० नदीखोऱ्यांतील पाणी कलशांच्या माध्यमातून नर्मदेला अर्पण करण्यात येईल. गोदावरी आणि नर्मदेचे महात्म्य लक्षात घेऊन आणि विचार, वारसा आणि विकास ही त्रिसुत्री घेऊन यात्रेच्या माध्यमातून जलसंवर्धनाचा संदेश देण्यात येणार आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवींनी केलेले जलसंवर्धनाचे कार्य जनतेत रुजविण्याचा प्रयत्न या यात्रेद्वारे करण्यात येणार आहे, असे त्यांनी सांगितले. नागरिकांनी या यात्रेत सहकार्य करावे असे आवाहनही श्री. विखे पाटील यांनी केले.

आण्णासाहेब मोरे म्हणाले, जलसाक्षरतेचे विचार सेवेकऱ्यांमार्फत पोहोचविण्यात येत आहेत. गुरुपिठाच्या माध्यमातून नदी स्वच्छता उपक्रम राबविण्यात येत आहेत. देशाच्या विकासासाठी थोरामोठांचे विचार भारतभर पोहोचविण्याचे काम करावे लागतील. संस्कृती, संस्कार केले तर देश बलशाली आणि विकसित होईल. नवीन पिढीने निर्व्यसनी राहून देशाचे संस्कारदूत बनावे, असे आवाहन त्यांनी केले. मुख्यमंत्र्यांच्या आगमनाने कुंभमेळ्याच्या कामांना अधिक गती मिळेल, असा विश्वास व्यक्त करून कुंभमेळ्यात गर्दीचे नियोजनाबाबत त्यांनी सूचना केल्या.युवराज होळकर म्हणाले, अहिल्यादेवी होळकर यांनी जलव्यवस्थापनाची सुरुवात नर्मदा येथे केली. जलसाक्षरता आणि जलव्यवस्थापन ही काळाची गरज आहे. गोदावरी आणि नर्मदेला जोडून 'एक भारत श्रेष्ठ भारत'चा संदेश दिला जाणार आहे. गोदावरी महाराष्ट्राची तर नर्मदा मध्यप्रदेशची जीवनधारा आहे. जन्मभूमी ते कर्मभूमी जलयात्रेचे आयोजन केल्याबद्दल त्यांनी महाराष्ट्र शासनाचे आभार मानले. अहिल्यादेवींनी सुरू केलेली फड पद्धती उपयुक्त असून ती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवावी, असे आवाहनही त्यांनी केले.

यावेळी गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या हस्ते कुशावर्तातील जलकलश मुख्यमंत्री फडणवीस यांना सुपूर्द करण्यात आला आणि राज्यातील ३० नदीखोऱ्यांतील पाणी कलशांच्या माध्यमातून आणून त्याचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले. केदार कंठशिखर वयाच्या सहाव्या वर्षी सर करणाऱ्या चिमुकल्या मनकर्णिका देशपांडे हिचा सत्कार मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आला. 'गोदा ते नर्मदा जलयात्रा २०२६' या गीताचे विमोचन आणि उन्नत नाशिक अभियानाच्या बोधचिन्हाचे अनावरण मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमापूर्वी श्री. विखे पाटील यांनी सपत्नीक १०८ कन्यकांचे पूजन केले.

कार्यक्रमाला माजी मंत्री रवींद्र चव्हाण, सदाभाऊ खोत, आमदार गोपीचंद पडळकर, राहुल आहेर, सीमा हिरे, देवयानी फरांदे, हिरामण खोसकर, दिलीप बनकर, विभागीय आयुक्त डॉ.प्रवीण गेडाम, मंत्री विखे पाटील यांच्या पत्नी शालिनीताई विखे पाटील, नगराध्यक्षा त्रिवेणी तुंगार, ह.भ.प.संजय नाना धोंगडे, महंत उद्धव महाराज मंडलिक, मंदाकिनी मोरे, महामंडलेश्वर रामचंद्रदास मोरे, उपमहापौर विलास शिंदे आदी उपस्थित होते.

'जल व्यवस्थापन कृती पंधरवड्या' अंतर्गत आयोजित या जलयात्रेचा मुख्य उद्देश राज्यातील जलस्त्रोतांबाबत जनजागृती करणे, लोकसहभाग वाढवणे आणि शाश्वत पाणी व्यवस्थापनाची संकल्पना अधिक बळकट करणे हा आहे. ही जलयात्रा २५ एप्रिल ते २९ एप्रिल या कालावधीत महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशातील विविध जिल्ह्यांतून प्रवास करणार आहे. यात्रेत सुमारे ५०० जलयात्री, वारकरी आणि तरुण सहभागी झाले आहेत.

# ज्ञानभारत प्रकल्पांतर्गत राष्ट्रीय हस्तलिखित सर्वेक्षण मोहिमेला प्रारंभ

दैनिक वादळ वार्ता
बीड । प्रतिनिधी

भारताच्या समृद्ध हस्तलिखित वारशाचे जतन, दस्तऐवजीकरण आणि डिजिटलायझेशन करण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारच्या संस्कृती मंत्रालयाच्या वतीने ज्ञानभारत (Gyan Bharatam) प्रकल्पांतर्गत राष्ट्रीय हस्तलिखित सर्वेक्षण मोहिमेला १६ मार्च २०२६ पासून देशभरात प्रारंभ करण्यात आला आहे.

भारताला हस्तलिखितांचा मोठा आणि वैविध्यपूर्ण वारसा लाभलेला असून पारंपरिक ज्ञान पिढ्यान्पिढ्या हस्तलिखितांच्या माध्यमातून प्रसारित होत आले आहे. मात्र, ही हस्तलिखिते विविध ठिकाणी विखुरलेल्या स्वरूपात असल्याने त्यांचे एकत्रित संवर्धन व उपलब्धता आवश्यक ठरली आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाने ज्ञानभारत प्रकल्पाची आखणी केली आहे. या प्रकल्पाचा मुख्य उद्देश देशातील मौल्यवान हस्तलिखित वारशाचे सर्वेक्षण, नोंदणी, संवर्धन, डिजिटलायझेशन आणि व्यापक प्रसार करणे हा आहे.

केंद्रीय अर्थसंकल्प २०२५ मध्ये जाहीर झालेल्या या महत्त्वाकांक्षी योजनेअंतर्गत देशभरातील शैक्षणिक संस्था, संग्रहालये, ग्रंथालये, धार्मिक संस्था तसेच खाजगी संग्राहक यांच्या सहकार्याने कोट्यवधी हस्तलिखितांचा शोध घेऊन त्यांची नोंदणी केली जाणार आहे. तसेच या हस्तलिखितांचा राष्ट्रीय डिजिटल संग्रह (National Digital Repository) तयार करून तो राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उपलब्ध करून देण्याचा शासनाचा मानस आहे. हस्तलिखितांची मालकी संबंधित संस्था किंवा व्यक्तीकडेच राहणार असून इच्छेनुसार शासनाकडे सुपूर्द करण्याची सुविधाही उपलब्ध राहणार आहे.या मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य सरकारांची भूमिका महत्त्वाची असून विविध सांस्कृतिक संस्था, विद्यापीठे, संशोधन संस्था आणि हस्तलिखित संग्रहालयांच्या सहकार्याने ही मोहीम राबवली जाणार आहे.

महाराष्ट्र राज्यासाठी राज्य नोडल संस्था म्हणून पुराभिलेख संचालनालय, मुंबई यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राज्य नोडल अधिकारी म्हणून सुजितकुमार उगले कार्य




पाहणार असून सहनोडल अधिकारी म्हणून अंजली दामळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

राज्यात या प्रकल्पासाठी काही संस्थांची क्लस्टर केंद्र व स्वतंत्र केंद्र म्हणून निवड करण्यात आली आहे. त्यामध्ये नागपूर येथील कवि कालिदास संस्कृत विद्यापीठ तसेच पुणे येथील भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था क्लस्टर केंद्र म्हणून, तर आनंद आश्रम संस्था आणि भारत इतिहास संशोधक मंडळ स्वतंत्र केंद्र म्हणून कार्यरत राहणार आहेत.सर्वेक्षणासाठी Gyan Bharatam हे मोबाईल ॲप विकसित करण्यात आले असून त्याद्वारे हस्तलिखितांचे क्षेत्रीय मूल्यांकन, पडताळणी आणि दस्तऐवजीकरण प्रक्रिया पार पाडली जाणार आहे. या मोहिमेत शैक्षणिक संस्था, ग्रंथालये, संग्रहालये, संस्कृत पाठशाळा, धार्मिक संस्था, संशोधक, पारंपरिक पंडित तसेच NCC, NSS स्वयंसेवक, विद्यार्थी आणि वारसा संवर्धन संस्थांचा सक्रिय सहभाग अपेक्षित आहे.जिल्हास्तरावर जिल्हा नोडल अधिकारी नियुक्त करणे, जिल्हास्तरीय समित्या स्थापन करणे तसेच मंदिर, मठ, शैक्षणिक संस्था व खाजगी संग्राहकांना या सर्वेक्षणात सहभागी करून घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

या पार्श्वभूमीवर नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की, त्यांच्या जवळ काही हस्तलिखिते उपलब्ध असल्यास त्यांनी त्यांची माहिती ज्ञानभारत मोबाईल ॲपवर अपलोड करून या राष्ट्रीय कार्यात सहभाग नोंदवावा,असे आवाहन करण्यात आले आहे.



# संपादकीय

## मराठी बोलायची कोणी ?

अभिजात भाषेचा मान मिळवूनही आज मराठी आपल्याच घरात पोरकी होतेय की काय, अशी भीती वाटू लागली आहे. रिक्षा–टॅक्सीचालकांनी मराठी बोललं पाहिजे ही मागणी कायदेशीररीत्या योग्यच आहे, पण जेव्हा दोन मराठी माणसं एकमेकांशी हिंदीत संवाद सुरू करतात, तेव्हा त्या मागणीतील धार कमी होते.राज्यातील रिक्षा आणि टॅक्सीचालकांसाठी एक मेपासून केलेला मराठी सक्तीचा निर्णय सध्या मत–मतांतरांनी गाजतो आहे. या निर्णयाला कायदेशीर आधार असल्याने त्याला थेट विरोध करणं कोणालाही अडचणीचंच आहे. त्यामुळे, वेगवेगळी खुस्पटं काढून त्यात खोडा घालण्याचा प्रयत्न सुरू आहे. राजकीय पक्षांमध्ये या निर्णयाला विरोध शिवसेनेतूनच झाला आहे. शिवसेनेतील अमराठी, उत्तर भारतीय नेते संजय निरुपम यांना प्रकाशझोतात येण्यासाठी हे चांगलं निमित्त मिळालं. यात दोन गंमती आहेत. मूळ निर्णय परिवहन विभागाचा आहे. त्याचे मंत्री प्रताप सरनाईक हे शिवसेनेचे नेते आहेत. त्यांच्या निर्णयाला विरोध करण्यासाठी उभे राहिलेले पहिले नेते निरुपमही त्याच पक्षाचे आहेत!निरुपम मूळ पत्रकार. ते मुंबईत राजकीय क्षितिजावर उगवले ते पूर्वीच्या, म्हणजे मूळ शिवसेनेतून. हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे असतानाच. दोन वेळा खासदारकी झाल्यानंतर ते काँग्रेसवासी झाले. तिथून पुन्हा विभाजित शिवसेनेच्या, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटात सामील झाले. सरनाईक यांच्या निर्णयाला विरोध करण्यासाठी त्यांनी काल दहिसर गाठलं. तिथे त्यांची महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या सैनिकांशी गाठ पडली. त्यातून जो गोंधळ व्हायचा, तो झाला. रिक्षा–टॅक्सीचालकांसाठी मराठीसक्तीचा मुद्दा त्यामुळे वादाचा झाला. मनसेने आता साहजिकच त्यात पुढाकार घेतला आहे. ’महाराष्ट्रात मराठीचं भवितव्य’ हा चिंतेचा विषय आजचा नाही. दशकानुदशके या विषयावर चर्वितचरण सुरू आहे. मराठीची पीछेहाटही अव्याहत सुरू आहे!! दरम्यानच्या काळात मोठा जोर लाऊन, राजकीय परिस्थितीचा फायदा उठवून महाराष्ट्राने मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळवला. हा दर्जा देणं केंद्राचं काम होतं. महाराष्ट्राच्या सरकारने ते केंद्राला करायला लावलं. पण, हा दर्जा मिळाल्यानंतर मराठीसाठी काही भरीव करायला हवं होतं ना? दोन–चार संशोधन प्रकल्प तरी सुरू व्हायला हवे होते. निदान मुंबईतल्या ’मराठी भाषा भावना’चं काय? हा प्रश्न विचारायला हवा होता. ते कोणी केलं का? आपली भाषा दुसऱ्याच्या माथी मारून त्यातून मातृभाषेचा विकास होईल, हा समज खरोखरच अजब आहे!भाषावार प्रांतरचनेच्या मूळ उद्देशाला धरून प्रत्येक प्रांतात तिथल्या राज्य भाषेचा वापर आणि विकास झाला पाहिजे, यात कोणाचंच दुमत नाही. कोणी याला विरोध करत असेल, तर त्याला तिथल्या तिथे या देशाच्या रचनेची जाणीव करून दिली पाहिजे. पण, आपली राज्यभाषा, आपली मातृभाषा जपण्याची, तिची प्रतिष्ठा वाढवण्याची, तिच्यात वेळोवेळी भर घालण्याची जबाबदारी त्या त्या भाषिक समूहांची असते. महाराष्ट्रात ही जबाबदारी मराठी भाषकांची आहे. त्यांनी व्यवहारात मराठी वापरली, तरच अन्य भाषकही आपसूक मराठी वापरतील. मराठी वापराची ही सुरुवात मराठी माणसानेच करायला हवी. ती त्याची जबाबदारी आहे. परप्रांतीय, अमराठी भाषकांची नाही. मुंबई ही साऱ्या देशाचं पोट भरणारी नगरी असल्याने इथे संपूर्ण देशातून लोक येत राहतात. वर्षानुवर्षं हे सुरू आहे. त्यामुळे, अन्य प्रांतातून मुंबईत येऊन स्थायिक झालेल्यांच्याही आता तीन – चार पिढ्या इथे नांदल्या आहेत. कायदेशीर भाषेत तेही ’महाराष्ट्रीय’च आहेत. तरीही अशा कुटुंबातल्या अनेकांना व्यवहारापुरतीही नीट मराठी येत नाही, हा दोष कुणाचा? त्यात त्यांचा वाटा तर आहेच; पण त्याहीपेक्षा अधिक त्यांना मराठी बोलणं, मराठी भाषेतून व्यवहार करणं अपरिहार्य न करणाऱ्या इथल्या स्थानिकांचा; म्हणजे मराठी माणसांचा आहे. बॉलिवूडचं केंद्र मुंबई असल्याने म्हणा, देशाची आर्थिक राजधानी ठरल्याने म्हणा, मराठी आणि हिंदीची लिपी एक असल्याने म्हणा, मराठी माणसाच्या न्यूनगंड म्हणा, की अतिभिडस्त स्वभाव म्हणा; पण मराठी माणूस मुंबईत सार्वजनिक ठिकाणी आपोआप हिंदी भाषेत शिरतो, हे ढळढळीत सत्य आहे. लोकल ट्रेनमध्ये सर्व अन्य भाषक आपल्या स्नेह्यांशी फोनवर किंवा अगदी आपसातही तारस्वरात मातृभाषेत बोलतात. सर्रास दिसणाऱ्या या दृश्यात मराठी माणूस तसा बोलताना कधी दिसतो का? दोन अनोळखी मराठी माणसंही आपला संवाद बहुतेकदा हिंदी किंवा इंग्रजीतूनच सुरू करतात. हा दोष कुणाचा? सेमी इंग्लिशचा पुरस्कार करूनही मराठी पालक आपल्या मुलांना शुद्ध इंग्रजी शाळेत घालण्यासाठी जीवाचा आटापिटा करतात. का? कारण, त्यांच्या नेत्यांची, साहित्यिकांची, अभिजात वर्गातली मुलं त्याच शाळेत शिकतात. मराठीतली नवी पिढी मराठीपासून अशी तुटली आहे, हे खरं ना? सामान्य मराठी माणसाने मराठी सण–उत्सव जिवंत ठेवण्याची जबाबदारी आपल्या शिरावर घेतली आहे. आता मराठी भाषा जगवण्याची जबाबदारीही त्यानेच घ्यायला हवी का? ते होत नाही, म्हणून भाषा जगवण्यासाठी तिचा असा विस्तार करायचा आहे का ?मुळात वाहनचालक ज्या राज्यात परवाना घेत असेल, त्या राज्याची भाषा किमान स्वरूपात त्याला यायलाच हवी, असा नियम आहे. महाराष्ट्रात २०११ मध्येच त्याचा अंतर्भाव झाला आहे. त्याची कडक, अनिवार्य अंमलबजावणी व्हावी यासाठी सरकारने आता भूमिका घेतली आहे आणि ती योग्यच आहे. मध्य मुंबईतले अमराठी दुकानदार चांगली मराठी बोलतात. कारण, ती त्यांची व्यावसायिक गरज आहे. सर्व मराठीबहुल भागात हा अनुभव येईल. मुंबईने मराठी बोलावं असं वाटत असेल, तर मुंबईच्या वातावरणात मराठी पाहिजे. कानावर सतत मराठी पडली पाहिजे. परप्रांतीय टॅक्सी आणि रिक्षाचालक इथे निव्वळ पोट भरायला आले आहेत. मराठीचा दुःस्वास करायला नाही. पोट भरण्यासाठी, व्यवसायासाठी जे आवश्यक, ते ते करतीलच. मराठीही बोलतील. अट एकच आहे, मराठी माणसाने त्याच्याशी मराठीत बोललं पाहिजे. दुसऱ्यावर सक्ती करण्यापूर्वी आपण आपल्यावरच ही सक्ती करायला हवी. तसं केलं तर, ना शासन निर्णयाची गरज भासेल, ना कुठल्या अटी – शर्तींची, ना आंदोलनाची!

# जनगणना महत्त्वाचीच कारण!

देशाच्या विकासात विविध धोरणांचा विचार करावा लागतो आणि हा करताना याचा मूळ आधार अर्थात लोकसंख्या होय. आपल्या नियोजनाची सुरुवात यापासून करावी लागते यात लोकसंख्या नेमकी किती आहे आणि ही लोकसंख्या कोणत्या दराने वाढेल याचा पुढील १० वर्षाचा अंदाज घेऊन नियोजन केल्यास त्यातून समाज घटकांना देण्यात येणारे लाभ व त्यावरील खर्च याचा अंदाज बांधणे शक्य होते. म्हणून विकास करताना त्या लोकसंख्येची गणना अर्थात जनगणना महत्त्वाची ठरते.

आपल्या देशात यापूर्वीची जनगणना २०११ साली झाली होती त्याच्या आकडेवारीवर आधारित नियोजन सध्या सुरू आहे. या नियोजनात अचूकता यावी यासाठी आता पुन्हा जनगणना होत आहे. जनगणना २०२७ ला आता सुरुवात होईल याचा पहिला टप्पा म्हणजे घरांची संख्या मोजणी आणि त्यांची यादी करणे त्याला होम लिस्ट ऑपरेटिंग म्हणता येईल. त्या टप्प्याला अर्थात क्ङज ला राज्यात महाराष्ट्र दिनी अर्थात एक मे २०२६ पासून सुरुवात होत आहे.

आपल्या देशात सर्वप्रथम जनगणना ब्रिटिश राजवटीत १८७२ साली झाली होती त्यानंतर दर १० वर्षांनी जनगणना करण्याची सुरुवात १८८१ या वर्षापासून सुरू करण्यात आली.

नियोजनाचा पाया असणारी ही जनगणना आता होईल देशाची




एकूण लोकसंख्या आणि त्यात होणाऱ्या वाढीचा दर शहरी आणि ग्रामीण भागातील लोकसंख्या साक्षरता उत्पन्न तसेच रोजगाराची स्थिती, स्त्री–पुरुष प्रमाण नागरी वस्त्यांमधील लोकसंख्या आणि त्यानुसार उपलब्ध निवास, पाणी आणि वीज यासारख्या मूलभूत सुविधांची स्थिती या सर्वांचा अंदाज आकडेवारीत उपलब्ध करून देण्याचे काम या जनगणनेद्वारे होणार आहे.

शासन लोकशाहीत लोकांनी नियुक्त केलेले जनप्रतिनिधी आणि शासन–प्रशासन यंत्रणा या माध्यमातून लोकांच्या निधीतून अर्थात करामार्फत लोकोपयोगी योजना आखते. शिक्षण, रोजगार तसेच आरोग्य सुविधा, नागरी सुविधा, यासाठी जनगणनेचा उपयोग होतो.

लोकांकडून प्राप्त होणाऱ्या निधीचे लोकांसाठीच्या विविध योजनांमध्ये वितरण करताना कुठे कोणती संसाधने आहेत याची आकडेवारी करून निधी वितरण या द्वारे योग्यरीत्या करता येते. देशाचा विकास करताना नेमकेपणाने धोरण ठरवणे यांनी त्याची अंमलबजावणी करणे यासाठी जनगणना जितकी उपयुक्त आहे तितकीच ती अर्थशास्त्र आणि समाजशास्त्र यांच्या संशोधनासाठी देखील आवश्यक ठरते.

जनगणना दोन टप्प्यात होणार आहे यात घरसूची संकलन पहिला टप्पा असून दुसऱ्या टप्प्यात लोकसंख्या मोजणे अर्थात प्रत्येक व्यक्तींची घरोघरी जाऊन माहिती गोळा करणे होय यात व्यक्तिगत माहिती गोळा करण्यात येणार आहे.

देशाच्या ध्येय धोरण व आर्थिक विकासात मोलाच्या ठरणाऱ्या या जनगणनेत सहभाग नोंदवणे हे मोठे राष्ट्रीय कार्य ठरणार आहे.

**–प्रशांत दैठणकर**
**जिल्हा माहिती अधिकारी,बीड**

# परांजपे स्कीम्सच्या ‘अथश्री’ला २५ वर्षे पूर्ण; भारतातील ज्येष्ठ नागरिक निवास क्षेत्रात ६,००० रहिवाशांचा टप्पा, भविष्याभिमुख दृष्टीकोन अधोरेखित

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

नवे निवासी प्रकल्प साकारण्यात अग्रणी असलेल्या परांजपे स्कीम्स (कन्स्ट्रक्शन) प्रा. लि. या नामांकित विकसकाच्या ‘अथश्री’ या ज्येष्ठ नागरिक निवास उपक्रमाला २५ वर्षे पूर्ण झाली आहेत. भारतातील संघटित ज्येष्ठ नागरिक निवास क्षेत्राच्या घडणीत ‘अथश्री’ने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. दूरदृष्टीतून सुरू झालेला हा उपक्रम आज सन्मान, स्वावलंबन आणि समुदायाधारित जीवनमूल्यांवर आधारलेली सक्षम व्यवस्था बनली आहे.या महत्त्वपूर्ण टप्प्याचे औचित्य साधत, वडोदरा येथे ‘अथश्री’च्या ६,००० व्या रहिवाशाला घराचा ताबा देण्याचा सोहळा पार पडला. या कार्यक्रमात रहिवासी, व्यवस्थापन आणि भागीदार सहभागी झाले होते. आज ‘अथश्री’चे जाळे सुमारे १६ ज्येष्ठ नागरिक वसाहतींमध्ये विस्तारले असून, विविध शहरांमध्ये ३,००० हून अधिक ज्येष्ठ नागरिकांना निवास व सुविधा दिल्या जात आहेत. कार्यक्रमाची सुरुवात परांजपे स्कीम्सचे अध्यक्ष श्रीकांत परांजपे यांच्या भाषणाने झाली. त्यानंतर व्यवस्थापकीय संचालक शशांक परांजपे यांनी ‘अथश्री’चा प्रवास आणि वाढती गरज याविषयी मनोगत व्यक्त केले. यानंतर ‘अथश्री’मधील रहिवाशांनी सादर केलेल्या कलाप्रस्तुतींनी या समुदायातील उत्साह आणि सक्रिय जीवनशैली अधोरेखित केली.या निमित्ताने परांजपे स्कीम्स कन्स्ट्रक्शन प्रा. लि.चे व्यवसाय विकास संचालक अमित परांजपे यांनी आरोग्यसेवा, वेलनेस, आपत्कालीन मदत आणि समुदाय सहभाग या क्षेत्रांमध्ये नव्या भागीदारी जाहीर केल्या. या उपक्रमांतर्गत अग्रगण्य आरोग्य संस्थांशी सहकार्य करून ओपीडी, आयसीयू, लघु शस्त्रक्रिया सुविधा तसेच कार्डियाक ॲम्ब्युलन्स आणि ऑन–कॉल पॅरामेडिक सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. यासोबतच पडल्यास तत्काळ इशारा देणारी आणि महत्त्वाच्या आरोग्य निर्देशकांचे रिअल–टाइम निरीक्षण करणारी हेल्थ मॉनिटरिंग प्रणाली सुरू केली जाणार आहे, ज्याची माहिती डॉक्टर आणि कुटुंबीयांना उपलब्ध राहील. वेलनेस उपक्रमांतर्गत योग संस्था आणि तज्ज्ञ प्रशिक्षकांच्या मदतीने नियमित योग व फिटनेस कार्यक्रम राबवले जातील. तसेच ऋगएङ डलहेश्र, उराश्रळप, जीळसराळ चळीीर आणि कन्सिअर्ज सेवा देणाऱ्या संस्थांबरोबरच्या सहकार्याद्वारे सर्जनशील उपक्रम, शिक्षण आणि घरगुती सहाय्य सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील.कार्यक्रमानंतर ‘अथश्री’मधील उल्लेखनीय योगदान देणाऱ्या रहिवाशांचा विशेष सत्कार करण्यात आला. यात अणु विज्ञान आणि सिग्नल प्रोसेसिंग क्षेत्रातील अग्रगण्य शास्त्रज्ञ डॉ. मोहन फडणीस; पद्मश्री पुरस्कार विजेते आणि आयआयटी कानपूरचे




माजी संचालक संजय गोविंद धांडे; १९७१ च्या युद्धातील शौर्यासाठी वीरचक्र सन्मानित विंग कमांडर सुरेश कर्णिक; कर्करोग संशोधन क्षेत्रातील मान्यवर आणि टाटा मेमोरियल सेंटरच्या माजी वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रिता मुल्हेरकर; तसेच मराठी रंगभूमी आणि चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेत्री वंदना गुप्ते यांचा समावेश होता. या सत्कार सोहळ्याने ‘अथश्री’ समुदायातील अनुभव, कर्तृत्व आणि सक्रिय जीवनशैली अधोरेखित केली.

यावेळी बोलताना व्यवस्थापकीय संचालक शशांक परांजपे म्हणाले, ज्येष्ठ नागरिक सन्मानाने आणि स्वावलंबीपणे राहू शकतील अशी जागा निर्माण करण्याच्या साध्या विचारातून सुरू झालेला हा प्रवास आज हजारो लोकांचा विश्वास संपादन करणाऱ्या वास्तवात परिवर्तित झाला आहे. अक्षय तृतीया या शुभ दिवशी हा टप्पा गाठल्याने या सोहळ्याचे महत्त्व अधिक वाढले आहे. ज्येष्ठ नागरिक निवास म्हणजे केवळ घरे उभारणे नव्हे, तर जिथे प्रत्येकाला आपलेपणाची जाणीव होते, असे वातावरण निर्माण करणे हा आमचा उद्देश आहे. नाशिक, कोल्हापूर, नागपूर तसेच अहमदाबाद आणि जयपूरसारख्या शहरांमध्येही या क्षेत्राची मागणी झपाट्याने वाढत आहे.भारतामध्ये ज्येष्ठ नागरिक निवास क्षेत्राचा विस्तार ‘सिल्वर इकॉनॉमी’च्या वाढीसोबत जोडलेला आहे. वाढती आयुर्मर्यादा, बदलती कुटुंबरचना आणि स्वावलंबी जीवनशैलीची वाढती पसंती यामुळे हे क्षेत्र आता मर्यादित पर्याय न राहता मुख्य प्रवाहातील निवासी व्यवस्थेचा भाग बनत आहे.अमित परांजपे म्हणाले, भारतामध्ये ज्येष्ठ नागरिक निवास क्षेत्र नव्या टप्प्यात प्रवेश करत आहे. पूर्वी गरज म्हणून घेतला जाणारा निर्णय आता नियोजनबद्ध आणि जागरूक निवड बनत आहे. अनेक मिलेनियल्स आपल्या पालकांसाठी अशा समुदायांमध्ये गुंतवणूक करताना दिसत आहेत. महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण धोरण २०२५ अंतर्गत ज्येष्ठ नागरिक निवासासाठी स्वतंत्र श्रेणी आणि १,००० इतक्या नाममात्र स्टॅम्प ड्युटीची तरतूद हा या क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण निर्णय ठरणार आहे.भारताची लोकसंख्या रचना आणि सामाजिक परिदृश्य झपाट्याने बदलत असताना ‘अथश्री’सारखे उपक्रम वृद्धत्वाचा अनुभव नव्याने परिभाषित करत आहेत. काळजी, स्वावलंबन आणि सामाजिक जोड यांचा समतोल साधणारे असे समुदाय भविष्यातील ज्येष्ठ नागरिक निवासाची दिशा ठरवत आहेत.

# आमदार संजय गायकवाडांचे विधान विकृत व गुन्हेगारी स्वरुपाचे

## कारवाई करण्यास सरकार का घाबरते? हर्षवर्धन सपकाळांचा सवाल

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई (वृत्तसंस्था)**

शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी ‘शिवाजी कोण होता?’ या पुस्तकाचे प्रकाशक प्रशांत आंबी यांना अर्वाच्च भाषेत शिविगाळ केलीच पण त्यांची भाषा अत्यंत घाणेरडी, विकृत व गुन्हेगारी प्रवृत्तीची आहे. आमदार गायकवाड यांनी यावेळी कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्या हत्येबाबतही भाष्य केलेले आहे, अशा विकृत व गुन्हेगारी प्रवृत्तीच्या आमदारावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कारवाई करण्यास का घाबरतात?, असा प्रश्न महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी विचारला आहे.गांधी भवन येथे प्रसार माध्यमांशी बोलताना हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, आमदार संजय गायकवाड हे सातत्याने दादागिरी व गुंडगिरी करत असतात. आमदार कॅंटिंनमध्ये कामगारांना मारहाण करणे, बुलढाण्यात वाळू तस्करी, जबरदस्तीने जमीन बळकावणे, कोणालाही अत्यंत खालच्या भाषेत शिविगाळ करणे, ही त्यांची गुन्हेगारी कृत्ये सुरुच आहेत. एवढेच काय तर भाजपा हा हिजड्यांचा पक्ष आहे, देवेंद्र



फडणवीस यांच्या तोंडात कोरोनाचे जंतू सोडा, राहुल गांधी यांची जीभ छाटणाऱ्यास १० लाखांचे बक्षीस देऊ, असे प्रताप या आमदार महोदयांनी यापूर्वी केले आहेत. फडणवीस यांच्यात हिम्मत असेल तर त्यांनी त्यांच्या पक्षाला दिलेल्या शिव्यांची तरी दखल घेऊन आमदार संजय गायकवाड यांच्यावर कठोर कारवाई करायला हवी, पण मुख्यमंत्री मात्र याला आमदाराला पाठीशी घालत आहेत, असे सपकाळ म्हणाले.‘शिवाजी कोण होता?’ हे पुस्तक आपल्यासाठी मोठा दस्तावेज आहे, पण या पुस्तकावर बोलताना आमदार संजय गायकवाड यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचाही अपमान केला. भाजपा व त्यांचे हस्तक शिवाजी महाराज यांचा अवमान करत असतात, राहुल सोलापूरकर, प्रशांत कोरटकर यासारख्या विकृत्तांनी महाराजांचा अपमान केला त्यावेळीही फडणवीस यांनी बोटचेपी धोरण स्विकारले होते. भगतसिंह कोश्यारी, मंगलप्रभात लोढा यांनीही महाराजांचा अपमान केला, त्यावेळीही फडणवीस यांनी काहीच कारवाई केली नाही. छत्रपतींचा अपमान करणाऱ्यांचे फडणवीस एकप्रकारे समर्थनच करत आहेत, असे यावरून दिसते असेही सपकाळ म्हणाले.

# मुंबई मनपा अर्थसंकल्पाची तूट म्हणजे व्यवस्थापन धोरणाबाबत विसंगती : नगरसेवक अमीर नसीम खान

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबई महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात ५,३७१.८ कोटींची तूट (वित्तीय कमतरता) दर्शवण्यात आली आहे; ही तूट अर्थसंकल्पीय विभागांमधून निधी भरून काढण्याचा प्रस्ताव आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, अर्थसंकल्पीय दस्तऐवजाच्या विभागांकडे स्वतःचे अत्यंत मर्यादित आर्थिक स्रोत आहेत अर्थसंकल्पीय विभागाकडून आर्थिक मदत पुरवली जाते. अर्थसंकल्पातील तूट व्यवस्थापनाच्या धोरणाबाबतची ही एक उघड विसंगती यातून समोर येते.अशी चिंता काँग्रेसचे नगरसेवक अमीर नसीम खान यांनी व्यक्त केली.अर्थसंकल्पीय चर्चेत भाग घेताना ते बोलत होते.या पार्श्वभूमीवर, जे आर्थिक स्रोत आधीच कमकुवत आहेत, अशा निधीच्या साठ्यांतून पैसे काढून तूट का भरून काढली जात आहे, हे तर्कसंगत वाटत नाही. हे म्हणजे एका हाताने पैसे द्यायचे आणि दुसऱ्या हाताने ते परत काढून घ्यायचे, यासारखेच आहे आणि अशा पद्धतीमुळे संपूर्ण व्यवस्था अपरिहार्यपणे आणखीच कमकुवत होईल.

या विशिष्ट निधीच्या साठ्यातून पैसे काढल्यास, मुंबईतील रस्ते काँक्रीटीकरण, जलशुद्धीकरण प्रकल्पांचा विकास, जोड रस्ते आणि पूल यांसारखे महत्त्वाचे पायाभूत सुविधा प्रकल्प ठप्प पडण्याची शक्यता आहे. यामुळे विकासाचा वेग अपरिहार्यपणे मंदावेल. परिणामी, याचा सामान्य जनता आणि शहराची मूलभूत पायाभूत सुविधा या दोन्हीवर अत्यंत गंभीर आणि प्रतिकूल परिणाम होऊ शकतो.याकडे त्यांनी लक्ष्य वेधले त्याचप्रमाणे शिक्षणासाठी अर्थसंकल्पीय विभागातून २,१८४ कोटींची रक्कम काढून घेणे, हा मुंबईतील वंचित मुलांवर विशेषतः झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या आणि शिक्षणासाठी महानगरपालिकेच्या शाळांवर अवलंबून असलेल्या मुलांवर–केलेला एक गंभीर अन्याय आहे.याकडे नगरसेवक अमीर खान यांनी लक्ष्य वेधले.शैक्षणिक वर्ष २०२४–२५ च्या आकडेवारीनुसार, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांचे गळतीचे प्रमाण विद्यार्थ्यांचे प्रमाण प्रचंड आहे. शिक्षणातील गुणवत्तेवर नियंत्रण ठेवण्यासाठी, मुंबई मनपा शाळांकरिता शाळा निरीक्षकांची भरती प्रक्रिया पूर्ण होणे, इतर सर्व रिक्त पदे भरणे आणि संपूर्ण कार्यप्रणालीवर काटेकोर देखरेख ठेवणे अत्यावश्यक आहे.शिवाय, आपल्या प्रादेशिक भाषांमध्ये कार्यरत असलेल्या शाळांना अधिक बळकट करण्याची गरज आहे.याव्यतिरिक्त, विद्यार्थ्यांच्या गळतीची प्रत्यक्ष आकडेवारी–वार्डनिहाय आणि शाळा–निहाय वर्गीकृत करून सार्वजनिकरीत्या उपलब्ध करून देण्यासाठी एक कार्यप्रणाली उभारण्याची तातडीची आवश्यकता असल्याची माहिती सभागृहात नगरसेवक अमीर नसीम खान यांनी दिली.

# आधुनिक शेळीपालनातून समृद्धीची नवी पहाट मिळता 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजक योजना'ची साथ

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

शेळी व मेंढीपालन हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो. कमी गुंतवणूक व जास्त परतावा देणारा हा व्यवसाय 'एटीएम' प्रमाणे ओळखला जातो. बाजारपेठेत शेळीच्या मांसाला दिवसेंदिवस वाढणारी मागणी व मिळणारा उत्तम दर लक्षात घेता, तरुणांचा या व्यवसायाकडे कल वाढत आहे. त्यातच आता 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजक योजना' अंतर्गत शेळी व मेंढीपालनासाठी भरीव आर्थिक सहाय्य देण्यात येणार असल्यामुळे तरुणांसाठी स्वयंरोजगाराची ही एक उत्तम संधी ठरणार आहे, अशी माहिती आयुक्त पशुसंवर्धन डॉ. किरण पाटील (भा. प्र.से.) यांनी दिली.

ग्रामीण तरुणांसाठी शेळी-मेंढीपालन एक उत्तम स्वयंरोजगाराचा पर्याय आहे. सुशिक्षित तरुण आता 'सेमी-स्टॉल फीडिंग' (अर्ध-बंदिस्त) पद्धतीने हा व्यवसाय आधुनिक तंत्रज्ञानाने करत आहेत. घरातील महिला घराचे काम सांभाळून या व्यवसायाचे व्यवस्थापन करू शकतात, ज्यामुळे त्यांना हक्काचे स्वतंत्र उत्पन्न मिळते. शेळी-मेंढी हे प्राणी कोणत्याही हवामानात (अति उष्ण किंवा कोरडे) स्वतःला जुळवून घेतात. निकृष्ट दर्जाचा चारा, झाडपाला व शेतातील उरले-सुरले अवशेष खाऊन हे प्राणी उत्तम प्रथिने (दूध आणि मांस) तयार करतात, जे मानवी आरोग्यासाठी पोषक असतात.

ग्रामीण भागातील या व्यवसायाला आता 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजने' ची भक्कम जोड मिळाली आहे. या योजनेमुळे पशुपालकांना केवळ आर्थिक अनुदानच नाही, तर आधुनिक तंत्रज्ञान, सुधारित जातींचे पशुधन व सुसज्ज गोठ्यांच्या निर्मितीसाठी प्रोत्साहनही मिळणार आहे. ही योजना ग्रामीण तरुणांना व महिलांना उद्योजकतेकडे वळवून त्यांना आत्मनिर्भर करण्यासाठी अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. थोडक्यात, पारंपारिक पशुपालनाला व्यावसायिकतेची जोड देऊन ग्रामीण भागात रोजगाराच्या नव्या संधी निर्माण करणे आणि पशुपालकांचे जीवनमान उंचावणे हेच या व्यवसायाचे आणि शासकीय योजनेचे मुख्य उद्दिष्ट आहे.

शेळी-मेंढीपालन प्रकल्पाद्वारे उद्योजकता विकास योजना (राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय):
राज्यस्तरीय जिल्हास्तरीय
लाभाचे स्वरुप: ५०+५ शेळी/मेंढी गट व ३ वर्षाचा विमा, शेड व साधन सामुग्री
लाभार्थी: सर्व प्रवर्गातील अत्यल्प भुधारक, अल्प भुधारक, महिला बचत गट
लाभार्थी निकष:
सर्वसाधारण प्रवर्ग, अनुसुचित जाती, अनुसूचित जमातीमधील लाभार्थी खालील घटकांमधून उतरत्या प्राधान्य क्रमाने करण्यात येईल.
अ) अत्यल्प भूधारक (१ हेक्टरपर्यंत भूधारक)
ब) अल्प भूधारक (१ ते २ हेक्टरपर्यंत भूधारक)
क) वनहक्क धारक
ड) महिला बचत गटातील लाभार्थी (अ.क्र. अ, ब, क मधील)
वरील घटकांमध्ये दिव्यांगांसाठी ५ टक्के व महिलांना ३० टक्के आरक्षण लागू राहील.
पात्रता:
१) स्वतःची १ एकर किंवा किमान ५ वर्ष नोंदणीकृत भाडेपट्टा इतकी जमीन आवश्यक, मात्र वनहक्क धारकांना सदर अट लागू राहणार नाही.
२) पशुपालन दुग्ध व्यवसायाचे शासकीय / निमशासकीय संस्थेचे प्रशिक्षण (अर्ज करताना प्रशिक्षण प्रमाणपत्र नसल्यास अनुदानाचा लाभ घेण्यापुर्वी प्रशिक्षण घेणे आवश्यक राहील) किंवा २ वर्षाचा शेळी/मेंढी व्यवसायाचा अनुभव
प्रकल्पाची किंमत : ५०+५ शेळी/मेंढी
१) पशुधन खरेदी- प्रती शेळी / मेंढी रु. १२,०००/- व बोकड / मेंढा रु.१५,०००/- प्रमाणे गटाची किंमत- रु. ६,७५,०००/-
२) ३ वर्षाचा विमा-१२.७५% (+ १८% GST)- रु. १,०१,५५४/-
३) शेड निर्मिती- रु. २,००,०००/-
४) कडबा कुट्टी यंत्र-रु.३०,०००/-
५) सोलर (३ ज्ञु)-रु. १,३२,०००/-
प्रकल्पाची एकूण किंमत - रु.११,३८,५५४/-
अनुदानाचे स्वरुप
१) सर्वसाधारण लाभार्थी ५० % ( रु. ५,६९,२७७/-)
२) अनु. जाती जमाती लाभार्थी ७५ टक्के (रु. ८,५३,९१५/-)
३) अनुदान २ टप्प्यात देय राहील. एकूण अनुदानाच्या ५० टक्के पहिल्या टप्प्याचे अनुदान लाभार्थ्याने शेड निर्मिती तसेच साधनसामुग्री खरेदी केल्यानंतर व उर्वरीत दुसऱ्या टप्प्याचे ५० टक्के अनुदान शेळी/मेंढी गट खरेदीनंतर देण्यात येईल. लाभाचे स्वरुप:
१) ५+१ शेळी / मेंढी गट + विमा किंवा
२) १०+१ शेळी / मेंढी गट + विमा
लाभार्थी:
सर्व प्रवर्गातील भुमीहीन, अत्यल्प भुधारक, अल्प भुधारक, महिला बचत गट
लाभार्थी निकष:
सर्वसाधारण प्रवर्ग, अनुसुचित जाती, अनुसुचित जमातीमधील लाभार्थी खालील घटकांमधून उतरत्या प्राधान्य क्रमाने करण्यात येईल.
अ) भुमीहीन (फक्त ५+१ शेळी/मेंढी गटासाठी)
ब) अत्यल्प भूधारक (१ हेक्टरपर्यंत भूधारक)
क) अल्प भूधारक (१ ते २ हेक्टरपर्यंत भूधारक)
ड) वनहक्क धारक
इ) महिला बचत गटातील लाभार्थी (अ.क्र. अ ते ड मधील) वरील घटकांमध्ये दिव्यांगांसाठी ५ टक्के तसेच ५+१ शेळी / मेंढी गटासाठी महिलांना ५० टक्के आणि १०+१ शेळी मेंढी गटासाठी ३० टक्के आरक्षण लागू राहील.
पात्रता
१) फक्त ५+१ शेळी / मेंढी गटासाठी जमीनीची अट लागू नाही.
२) किमान १ एकर स्वतःची किंवा किमान ५ वर्ष नोंदणीकृत भाडेपट्टा असलेली जमीन, मात्र वनहक्क धारकांना ही अट लागू राहणार नाही.
३) पशुपालन व्यवसायाचे शासकीय / निमशासकीय संस्थेचे प्रशिक्षण (अर्ज करताना प्रशिक्षण प्रमाणपत्र नसल्यास अनुदानाचा लाभ घेण्यापुर्वी प्रशिक्षण घेणे आवश्यक राहील) किंवा, २ वर्षाचा शेळी / मेंढीपालन व्यवसायाचा अनुभव.
गटाची किंमत
१) ५+१ शेळी/मेंढी
अ) पशुधन खरेदी
१) प्रती शेळी / मेंढी - रु. १२,०००/-
२) बोकड / मेंढा - रु. १५,०००/-
ब) विमा: १२.७५%
क) विक्री कर: १८%
ड) ५+१ शेळी / मेंढी गटाची एकूण किंमत: रु. ८६,२८४/-
२) १०+१ शेळी / मेंढी गटाची एकूण किंमत: रु. १,५५,३११/-
अनुदानाचे स्वरुप
१) सर्वसाधारण लाभार्थी - ५० टक्के
२) अनुसुचित जाती जमाती प्रवर्ग लाभार्थी ७५ टक्के

## मोबाईलचा अतिरेक

स्क्रीनचा उजेड वाढला.
नात्यावर काळोख चढला.
बोट सतत फिरत राहीली
माणसं मात्र दुरावली.

लाईकची भूक वाढली.
प्रेमाची किंमत घटली.
रात्र रात्र जागणं झालं
डोळ्यातलं तेज गेलं.



कानात गाणी घुमली
आईची हाक हरवली.
हातात फोन घट्ट धरला
हातातला घासच विसरला.

उठ आता वेळ गेली.
स्क्रीन सोड दुनिया भली
मोबाईल ठेव जरा बाजूला
माणूस होशील तू खरा.



**शब्दरचना**
**प्रा ज्ञानेश्वर कृष्णाजी बनसोडे**
**(पोलीस क्राईम न्यूज ब्यूरो चीफ)**
**साकुरी. ता. रहाता.जिल्हा. अहिल्या नगर**
**मो. ९६०४७९७३१६**

# लोहा तालुक्यातील सह्याद्री पब्लिक स्कूलचा यशराज देशमुख महाराष्ट्रात अव्वल

## शालेय ते राष्ट्रीय पातळीवर यशाची मालिका

**दैनिक वादळ वार्ता**
**लोहा । प्रतिनिधी**

लोहा तालुक्यातील कारेगाव येथील रहिवासी असलेले यशराज नामदेव देशमुख (इयत्ता ८ वी, सह्याद्री इंग्लिश स्कूल, पारडी) यांनी नुकत्याच पुणे येथे झालेल्या थळवो डलळशपलश स्कॉलरशिप परीक्षेत महाराष्ट्रात प्रथम क्रमांक पटकावून तालुक्याचे नाव उज्ज्वल केले आहे. त्यांच्या या यशाबद्दल सह्याद्री प्राथमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पारडी येथे भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी लोहा तहसीलचे तहसीलदार विठ्ठल परळीकर यांच्या हस्ते यशराजचा सन्मान करण्यात आला. यशराजने यापूर्वीही विविध राज्यस्तरीय व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे. Indian School Talent Search Exam (ISTSE) मध्ये भारतात प्रथम क्रमांक, SilverZone STEM परीक्षेत भारतात प्रथम, SilverZone Computer परीक्षेत भारतात प्रथम, तसेच Unified Council English Olympiad मध्येही भारतात प्रथम क्रमांक, स्कॉलरशीप परीक्षेत महाराष्ट्रात प्रथम क्रमांक, होमीभाभा बालवैज्ञानिक परीक्षेत महाराष्ट्रात प्रथम क्रमांक मिळवून त्याने सातत्यपूर्ण यशाची परंपरा कायम ठेवली आहे. अशा अनेक स्पर्धांमध्ये अव्वल स्थान पटकावत त्याने आपली बुद्धिमत्ता व मेहनतीची छाप उमटवली आहे. सह्याद्री पब्लिक स्कूल चे संस्थापक संचालक श्री सुदर्शन शिंदे सर, नंदकिशोर मेकाले, अनिल जाधव यांनी यशराजला मार्गदर्शन केले.

यशराजच्या या यशाबद्दल गाव, तालुका, जिल्हा तसेच राज्य स्तरावर विविध ठिकाणी त्याचा सत्कार करण्यात येत असून, त्याला सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्रे, ट्रॉफी सुवर्णपदक,तसेच लाखो रुपयांची बक्षिसे प्राप्त झाली आहेत. त्याच्या घरात मिळालेल्या पुरस्कारांनी घरच भरून गेले असून कुटुंबियांचा आनंद गगनात मावत नाही. यशराजचे आजोबा शेतकरी असून त्यांनी शेतीसोबतच लोहा येथे मशिनरी व्यवसाय उभा केला आहे. त्यांचे वडील व आई दोघेही शिक्षक असून शिक्षणाला प्राधान्य देत त्यांनी यशराजला उत्तम मार्गदर्शन केले. कुटुंबातील शैक्षणिक वातावरण आणि जिद्दीच्या जोरावर यशराजने हे यश संपादन केले आहे.

गल्लीतून ते राज्यस्तरापर्यंत अधिकारी, शिक्षक, मित्रपरिवार व ग्रामस्थांकडून होत असलेला सत्कार हा यशराजच्या परिश्रमाचा गौरव ठरत आहे. भविष्यातही देशपातळीवर अधिक मोठे यश मिळवण्याचा त्याचा निर्धार असून, त्याची ही वाटचाल इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.



# टक्केवारी घेतल्यामुळे शेतकऱ्याला पिक विमा मिळण्यास विलंब लागणार-वसंत मुंडे

**दैनिक वादळ वार्ता**
**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील ईडी व त्रिमूर्ती सरकारमधील आजीमाजी कृषिमंत्र्यांनी व कृषी अधिकाऱ्यांनी पिक विमा कंपन्याकडून टक्केवारी घेतल्यामुळे शेतकऱ्याचा पिक विम्याचा प्रश्न प्रलंबित पडल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केला आहे.शेतकऱ्यांनी जिल्हा विभाग,राज्यस्तरीय अनेक पुराव्यासहीत लेखी तक्रारी शासनाकडे दाखल करून उच्च न्यायालयापर्यंत विविध जिल्ह्यातील पिक विमा संदर्भात शासनाला व पिक विमा कंपन्यांना शेतकऱ्याचे पैसे त्वरित खात्यात वर्ग करण्याचे आदेश देऊनही कारवाई केली जात नाही.आर एस एस च्या विचारधारेचे केंद्रातील भाजप सरकार यांनी २०१६ पासून पिक विमा संदर्भात खाजगीकरण केले. त्यामुळे शेतकऱ्याचा मोठ्या प्रमाणावर पिक विमा मिळण्यामध्ये अडथळे निर्माण झाले आहेत.२०२० पासून आजपर्यंत खाजगी पिक विमा कंपन्याकडून कृषी चे प्रशासकीय अधिकारी आजी माजी मंत्री यांनी सर्व कंपन्याकडून टक्केवारी घेतल्यामुळे शेतकऱ्याला विमा मिळत नाही.प्रधानमंत्री पिक विमा योजना अंतर्गत सर्व वेगवेगळे निकष केंद्र व राज्य सरकारच्या नियमावली पिके पेरणी पासून काढणी पर्यंत कालावधीमध्ये अतिवृष्टी वीज कोसळणे,गारपीट, वादळ,चक्रीवादळ, दुष्काळ कमी जास्त पाऊस पडल्यामुळे शेतीच्या उत्पन्नावर परिणाम होतो या सर्व नियमाचे शासनाकडून विमा कंपन्याकडून पडताळणी करून विविध जिल्हास्तरीय नियमाचे तपासणी केल्यानंतर पिक विमा संदर्भात निर्णय घेतला जातो परंतु सर्व नियमाचे उल्लंघन करण्यात ईडी व त्रिमूर्ती सरकारमधील लोक प्रतिनिधी मंत्री प्रशासकीय यंत्रणा जबाबदार आहे.केंद्र व राज्य सरकारच्या पीक विमा योजने अंतर्गत सरकारकडून २० ते ३५ टक्के पीक विमा कंपन्यांना कमिशन मिळते.परंतु केंद्र व राज्य सरकार तसेच उच्च न्यायालयाचे आदेशाचे ही खाजगी विमा कंपन्या पालन करीत नाहीत. पिक विमा कंपन्यावर शासनाचे नियंत्रण नाही सर्व स्तरात पिक विमा मिळण्यास शेतकऱ्याला अडचणी निर्माण होत आहेत,तरी ही शासना कडून पिक विमा कंपन्यावर काळया यादीत टाकण्याची कारवाई केली जात नाही.२०२५ च्या पीक विम्या संदर्भात तर अतिवृष्टीमुळे हाहाकार माजलेला होता.सर्व स्तरावर पिकांची शेतकऱ्याची प्रचंड नुकसान झालेली आहे. तरी ही खाजगी पिक विमा कंपन्यांनी पर्जन्य मापक यंत्रणा व हवामान केंद्राचे अधिकारी तसेच महसूल,कृषी अधिकारी, लोकप्रतिनिधी,आजी माजी कृषिमंत्री कृषी आयुक्त,सांख्यिकी विभागाचा प्रमुख यांच्या बरोबर टक्केवारी देऊन तडजोड केल्यामुळे शेतकऱ्याला पिक विमा मिळण्यास विलंब लागणार असा गंभीर आरोप काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी केला आहे.



# प्रामाणिक प्रयत्न हेच यशाचे खरे सूत्र-डॉ.हनुमंत सौदागर

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनाचे ध्येय निश्चित करून,पुस्तकांशी मैत्री करत सातत्यपूर्णअभ्यास आणि प्रामाणिक प्रयत्न केल्यास यश निश्चित मिळते,असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.हनुमान सौदागर यांनी केले.ते सरस्वती महाविद्यालय, केज अंतर्गत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रा तर्फे आयोजित यशस्वी विद्यार्थी गौरव सोहळ्या प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.



कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी उपप्राचार्य डॉ. किरणकुमार धिमधिमे होते.तर सत्कारमूर्ती म्हणूनमहाविद्यालयातील विद्यार्थिनी रूपाली चांगदेव नेहरकर हिची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते तिला वृक्षरोप देऊन सन्मानित करण्यात आले.पुढे बोलताना डॉ.सौदागर म्हणाले की,वाचनातून ज्ञानप्राप्ती होते.पुस्तके माणसाला जगायला शिकवतात असे मत व्यक्त केले.अध्यक्षीय समारोपात उप प्राचार्य डॉ.धिमधिमे यांनी विद्यार्थ्यांना या यशस्वी विद्यार्थ्यांचा आदर्श घेऊन जीवनात पुढे जाण्याचे आवाहन केले.सत्काराला उत्तर देताना रूपाली नेहरकर हिने अपयशा नंतरही खचून न जाता जिद्द व चिकाटीने प्रयत्न केल्यास यश निश्चित मिळते,असा आत्मविश्वास व्यक्त केला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हिंदी विभाग प्रमुख प्रा.डॉ.संतोष मस्के यांनी केले. प्रास्ताविक स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे समन्वयक डॉ.नागेश कराळे यांनी केले,तर आभार प्रदर्शन प्रा.डॉ. रमेश माने यांनी मानले. कार्यक्रमास प्राध्यापक वृंद,शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

# टाकळी येथे उडणार बैलगाडा शर्यतीचा धुरळा! 'रानोबा केसरी'चा थरार रंगणार; आ.नमिताताई मुंदडा यांची विशेष उपस्थिती!

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

ग्रामीण संस्कृतीचा कणा आणि शौर्याचे प्रतीक असलेली बैलगाडा शर्यत आता टाकळी (केज) नगरीत थरार निर्माण करण्यास सज्ज झाली आहे.ग्रामदैवत श्रीरानोबा यात्रेनिमित्त 'पर्व ४ थे' अंतर्गत भव्य 'रानोबा केसरी' ओपन बैलगाडा शर्यतीचे जंगी आयोजन करण्यात आले आहे. सोमवार,दि.२७ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ८:३० वाजल्यापासून टाकळीच्या मैदानात हा 'नाद' घुमणार आहे.

**बक्षिसांचा पाऊस: ४१ हजारांसह मानाची ढाल!**
या स्पर्धेत विजेत्यांना एकूण सात क्रमांकापर्यंत भरघोस बक्षिसे दिली जाणार आहेत प्रथम क्रमांक ४१,००० व २ मानाच्या ढाली (सौजन्य: आ.नमिताताई अक्षय मुंदडा),द्वितीय क्रमांक ३१,००० व २ मानाच्या ढाली (सौजन्य: सुरज रामकृष्ण घुले),तृतीय क्रमांक २१,००० व २ मानाच्या ढाली (सौजन्य: विष्णू जीवन राख),या व्यतिरिक्त ७ व्या क्रमांका पर्यंत रोख बक्षिसे व ढालींचे वितरण केले जाईल.

**आपली परंपरा आणि खेळाडूंचा उत्साह वाढवण्यासाठी सर्व बैलगाडा प्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे.**
**- सुरजभैया घुले युवा नेते,भाजपा.**

केज तालुक्यात सध्या एकाच नावाची चर्चा आहे,ती म्हणजे टाकळी येथील 'रानोबा केसरी' बैलगाडा शर्यतीची.श्री रानोबा यात्रा कमिटी आणि ग्रामस्थ मंडळ, टाकळी यांच्या वतीने आयोजित या स्पर्धेत संपूर्ण जिल्ह्यातील नामांकित बैलगाडे सहभागी होणार आहेत.

अखिल भारतीय बैलगाडा संघटना आणि शासनाच्या सर्व नियमांचे पालन करून ही स्पर्धा पार पडणार आहे.स्पर्धे साठी ७९९ रुपये प्रवेश फी असून,बीड रोड पासून ५०० मीटर अंतरावर असलेल्या टाकळी शिवरस्त्यावरील मैदानात ही स्पर्धा रंगणार आहे.या सोहळ्याला आमदार नमिताताई मुंदडा,युवा नेते सुरजभैया घुले यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहून खेळाडूंचे मनोबल वाढवणार आहेत.



# घरकुल महाघोटाळा; गरीबांच्या स्वप्नांवर डल्ला!

## ४.२४ कोटींची अफरातफर; तत्कालीन मुख्याधिकाऱ्यासह ६ जणांवर गुन्हा दाखल

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज नगरपंचायतीतील भ्रष्टाचाराचा मोठा भंडाफोड झाला असून, गोरगरिबांच्या हक्काच्या घरकुल योजनेतील तब्बल ४ कोटी २४ लाख ७३ हजार २३ रुपये निधीचा अपहार झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी तत्कालीन मुख्याधिकारी मिलिंद सावंत यांच्यासह एकूण सहा जणांविरोधात केज पोलीस ठाण्यात गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांच्या खात्यावर थेट निधी जमा करणे बंधनकारक असताना, २० मे २०२१ ते ३१ जानेवारी २०२२ या कालावधीत संबंधित अधिकाऱ्यांनी संगनमत करून हा निधी नियमबाह्य पद्धतीने इतर खात्यांवर वळवला. पदाचा गैरवापर करत कोट्यवधी रुपयांची अफरातफर केल्याचे प्राथमिक तपासात स्पष्ट झाले आहे.




या प्रकरणाची तक्रार प्राप्त होताच बीड जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने दखल घेत उपविभागीय अधिकारी दीपक वजाळे यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमली. समितीच्या सखोल तपासणीत अनेक धक्कादायक बाबी समोर आल्या. कोणत्याही शासकीय आदेशाशिवाय निधी वळवण्यात आल्याचे तसेच अपहार लपवण्यासाठी महत्त्वाचे शासकीय कागदपत्रे गहाळ केल्याचेही उघड झाले आहे.

सध्याचे मुख्याधिकारी अजित गणपतराव ढोपे यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी तत्कालीन मुख्याधिकारी मिलिंद सावंत (सेवानिवृत्त), असद इसाकोद्दीन खतीब (लेखापाल), लक्ष्मण मारुती जगताप (कंत्राटी लेखापाल सहाय्यक), भास्कर एकनाथ ससाणे (व्हॉल्वमन), तसेच भीमराव शामराव मस्के आणि बाशेद वलियोद्दीन काझी यांच्यावर गुन्हा नोंदवला आहे.

या सर्व आरोपींवर गु.र.नं. २३६/२०२६ अन्वये भारतीय दंड विधान कलम ४०९ (शासकीय निधीचा अपहार), ४२० (फसवणूक), २०१ (पुरावे नष्ट करणे), २०४ आणि ३४ अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

दरम्यान, घरकुलासाठी वर्षानुवर्षे प्रतीक्षा करणाऱ्या गरिबांचा हक्काचा पैसा अशा प्रकारे लाटला गेल्याने केज शहरात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणातील मुख्य सूत्रधार कोण, आणखी किती जण यात सहभागी आहेत, तसेच पोलिसांकडून पुढे किती कठोर कारवाई होते याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# आंतरराज्यीय मोटार वायर चोरी टोळीचा पर्दाफाश; तीन आरोपी अटकेत,आठ जण फरार

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

बीड, परभणी व जालना जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या मोटारींच्या वायर चोरीच्या वाढत्या घटनांमुळे त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा देणारी मोठी कारवाई स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांनी केली आहे. आंतरराज्यीय पातळीवर कार्यरत असलेल्या मोटार वायर चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करण्यात पोलिसांना यश आले असून या प्रकरणात तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे, तर अन्य आठ आरोपी अद्याप फरार आहेत.



गेल्या काही दिवसांपासून शेतातील विहिरी, नदीकाठ व शेततळ्यांवरील मोटारींच्या वायर चोरीच्या घटना सातत्याने घडत होत्या. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत होते. या पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षक नवनित कावत (बीड) यांनी या घटनांची गंभीर दखल घेत स्थानिक गुन्हे शाखेला तपासाचे आदेश दिले होते.

त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बांगरवाड यांच्या नेतृत्वाखाली पथकाने तपास सुरू केला. तपासादरम्यान गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी नांदगाव परिसरात सापळा रचत कारवाई केली.

या कारवाईत धर्मेंद्र सुकलाल पारधी (वय २५, रा. कटनी, मध्यप्रदेश), शेख शफीक शेख बाबू (वय २५, रा. माजलगाव, जि. बीड) तसेच एका विधीसंघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेण्यात आले. आरोपींकडून चोरीसाठी वापरण्यात आलेल्या सुमारे १,५०,००० किंमतीच्या दोन मोटारसायकली जप्त करण्यात आल्या आहेत.चौकशीत आरोपींनी माजलगाव व केज उपविभागातील विविध ठिकाणी एकूण सहा चोरीच्या गुन्ह्यांची कबुली दिली आहे. या टोळीतील इतर आठ साथीदार फरार असून त्यांचा शोध सुरू आहे.या प्रकरणाचा पुढील तपास केज पोलीस ठाण्याकडून सुरू असून उर्वरित आरोपींना लवकरच अटक करण्यात येईल, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनित कावत, अपर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई चेतना तिडके यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बांगरवाड यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने, पोलीस हवालदार महेश जोगदंड, पोलीस हवालदार जफर पठाण, पोलीस हवालदार दिलीप गित्ते, पोलीस हवालदार बप्पासाहेब घोडके व चालक पोलीस हवालदार गणेश मराडे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

दरम्यान, या कारवाईमुळे परिसरातील शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त करत पोलिसांच्या कार्याचे कौतुक केले आहे.

# खून प्रकरणात आरोपींना सत्र न्यायालयाकडून जामीन मंजूर

दैनिक वादळ वार्ता
**देगलूर । प्रतिनिधी**

मरखेल पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गंभीर खून प्रकरणात अटकेत असलेल्या दोघांना बिलोली येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाने अंतरिम जामीन मंजूर केला असून, खुनाच्या आरोपाखाली न्यायालयीन कोठडीत असलेल्या आरोपी बालाजी मारोती गंदमुळे व हुल्लपा ज्ञानोबा गंदमुळे यांना शुक्रवारी (दि. २४) रोजी न्यायालयाने अटींसह जामीन मंजूर केला आहे.




सदर प्रकरणात आरोपींकडून नियमित जामीनासाठी अर्ज दाखल करण्यात आला होता. अर्जावरील सुनावणीदरम्यान बचाव पक्षातर्फे ॲड. अंकुशराजे तुळशीराम जाधव यांनी सखोल व कायदेशीर युक्तिवाद सादर केला. त्यांनी गुन्हा नोंदविण्यात झालेला विलंब, तपासातील त्रुटी, तसेच घटनाक्रमातील विसंगती यांकडे न्यायालयाचे लक्ष वेधले. तसेच, प्रकरणात आरोपींच्या विरोधात कोणताही ठोस, प्रत्यक्ष किंवा विश्वासार्ह पुरावा उपलब्ध नसल्याचे नमूद करून केवळ संशयाच्या आधारावर आरोपींना गुंतविण्यात आले असल्याचा मुद्दा तसेच बचावात्मक व तपास यंत्रणा व संबधित प्रकरणात असलेल्या त्रुटी न्यायालयासमोर मांडल्या. दोन्ही बाजूंचे युक्तिवाद विचारात घेऊन न्यायालयाने आरोपींना प्रत्येकी पन्नास हजारांच्या वैयक्तिक जामिनावर तसेच त्याच रकमेच्या एक सक्षम जामीनदाराच्या अटीवर मुक्त करण्याचा आदेश दिला. यासोबतच, आरोपींनी आवश्यकतेनुसार तपास यंत्रणेस सहकार्य करणे व पुढील सुनावणीस प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, देगलूर यांच्या न्यायालयात नियमित हजर राहणे बंधनकारक करण्यात आले आहे. या प्रकरणात ॲड. अंकुशराजे तुळशीराम जाधव यांनी मुख्य युक्तिवाद केला असून त्यांना ॲड. सद्दाम शेख दावणगीरकर व ॲड. विठ्ठल जेठे यांनी सहकार्य केले.

# विवेक कुचेकर यांचा वाढदिवस चौसाळा शहरात उत्साहात साजरा



दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

लोकनेते डॉ. बाबुरावजी जोगदंड साहेब यांचे निकटवर्तीय चौसाळा पत्रकार संघाचे अध्यक्ष राज्यस्तरीय समाजभुषण पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते विवेक(बाबा)कुचेकर हे नेहमी सामाजिक क्षेत्रात अग्रेसर असतात व सामाजिक जाणीव असल्यामुळे व्यर्थ खर्च न करता त्यांचा वाढदिवस हा सामाजिक उपक्रमानी साजरा करण्यात आला. गोरगरीब समाजातील हुशार अकरा विद्यार्थी एक वर्षासाठी शिक्षणासाठी दत्तक घेऊन हा वाढदिवस साजरा करण्यात आला तर सामाजिक कार्यकर्ते विवेक कुचेकर यांना वाढदिवसानिमित्त राज्यभरातुन सोशल मिडीयाच्या माध्यमातून विविध पक्ष सघटनेच्या नेते व कार्यकर्त्यानी शुभेच्छाचा वर्षाव केला तर विवेक कुचेकर यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना लोकनेते डॉ. बाबुराव जोगदंड साहेब,रिपाई जिल्हा उपाध्यक्ष बापु पवार,पंजाब चोरे, विशाल शिंदे,चौसाळा ग्रामपंचायत सदस्य आमोल कांबळे,मा. ग्रामपंचायत सदस्य शैलेश सोनवणे, भवानी ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष सुधाकर गुंजाळ, मराठा महासंघाचे बीड जिल्हाध्यक्ष बंकट शिंदे, पनवेल सोनवणे, सचिन सर सोनवणे,काकासाहेब नाईकवाडे,प्रकाश पवार, मिलींद सोनवणे,अक्षय बोबडे, बापु घोडके, प्रदीप चव्हाण यांच्यासह अनेक मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या.

# कोळगावच्या शिरपेचात विकासाचा तुरा; विविध विकासकामांचे लोकार्पण

दैनिक वादळ वार्ता
**कोळगाव । गणेश गाडेकर**

ग्रामपंचायत प्रशासन आणि लोकप्रतिनिधींच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे कोळगाव येथे गेल्या काही महिन्यांपासून विकासाची गंगा वाहत आहे. गावातील अंतर्गत रस्ते, पाणीपुरवठा योजना आणि सौरऊर्जेचे प्रकल्प पूर्णत्वास आले असून, यामुळे ग्रामस्थांच्या जीवनमानात मोठी सुधारणा झाली आहे.




**प्रमुख विकासकामे आणि ठळक वैशिष्ट्ये**

रस्ते काँक्रिटीकरण

गावातील मुख्य चौक ते बाजारतळ खराब रस्त्याचे पूर्णतः काँक्रिटीकरण करण्यात आले आहे. यामुळे पावसाळ्यात होणारा चिखलाचा त्रास आता कायमचा मिटला आहे.

हरित कोळगाव उपक्रम-ग्रामपंचायतीच्या माध्यमातून गावात ठिकठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले असून, सार्वजनिक ठिकाणी सुशोभीकरण अंतिम टप्प्यात आहे.

शुद्ध पेयजल योजना-जलजीवन मिशन अंतर्गत प्रत्येक घरापर्यंत नळाद्वारे पाणी पोहोचवण्याचे काम ९०% पूर्ण झाले आहे.त्याच प्रमाणे पिण्यासाठी आर ओ फिल्टर बसवण्यात आले आहे

सौर पथदिवे-वीज बचतीसाठी संपूर्ण गावात हाय-टेक सौर पथदिवे बसवण्यात आले आहेत, ज्यामुळे गाव रात्रीच्या वेळी उजळून निघत आहे.या विकासकामांच्या पूर्ततेमुळे पंचक्रोशीत कोळगावच्या कामाचे कौतुक होत असून, इतर गावांसाठी हे गाव एक उत्तम उदाहरण ठरत आहे.

> **कोळगावला एक 'आदर्श गाव' म्हणून नावारूपास आणण्याचे आमचे स्वप्न आहे. केवळ रस्ते आणि पाणीच नाही, तर आरोग्य आणि शिक्षणाच्या बाबतीतही आम्ही गावाला स्वयंपूर्ण बनवत आहोत. ग्रामस्थांचे सहकार्याने आगामी काळात कोळगाव डिजिटली साक्षर केले असून अजून सुधारणा करण्याचे स्वप्न आहे .**
>
> **–सरपंच पुरषोत्तम लगड**

# कै.नारायणराव चिद्रावार व्याख्यानमालेत डॉ.विठ्ठल लहाने यांचे व्याख्यान

दैनिक वादळ वार्ता
**देगलूर । प्रतिनिधी**

नांदेड जिल्ह्यातील ज्येष्ठ समाजातील नेते, देगलूरचे माजी नगराध्यक्ष , अनेक सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक संस्थेचे संस्थापक कै. नारायणराव चिद्रावार यांच्या ४० व्या स्मृतीदिनानिमित्त यावर्षी २ मे २०२६ रोज शनीवारी व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. या व्याख्यानमालेचे यंदाचे पुष्प जागतिक कीर्तीचे प्लास्टिक सर्जन व सुप्रसिद्ध वक्ते डॉ. विठ्ठलराव लहाने हे वैभवशाली भारतीय संस्कृती व राष्ट्र उभारणीत आपले योगदान या विषयावर गुंफणार आहेत, सदरील कार्यक्रमास प्रमुख पाहूणे म्हणून निजामबादचे आमदार धनपाल सूर्यनारायण गुप्ता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे महाव्यवस्थापक तथा मा उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव श्री बालाजीराव पाटील ख़तगावकर व मा.आ. जितेशजी अंतापुरकर (देगलूर विधानसभा मतदारसंघ) या मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.



या व्याख्यानमालेचे ३९ वर्षे पूर्ण झाले असून यंदाचे ४० वे वर्ष आहे. महाराष्ट्रातील थोर विचारवंत राजकारणी, सामाजिक कार्यकर्ते, साहित्यीक यांचे विचार लोकांपर्यंत जावेत व या माध्यमातून समाज प्रबोधनाचे कार्य व्हावे या सदहेतूने या व्याख्यानमालेचे आयोजन केले आहे. आज पर्यंत या व्याख्यानमालेत ना. ग. गोरे, माजी अर्थमंत्री मधु दंडवते, प्रा. राम शेवाळकर, राजीव दीक्षित, बापुसाहेब काळदाते, माजी गृह राज्यमंत्री भाई वैद्य , माजी शिक्षणमंत्री सदानंद वर्दे, माजी न्यायाधीश कोळसे पाटील, गो. रा. खैरनार, मेधाताई पाटकर, सदाशिव अमरापुरकर, निळु फुले, सिंधुताई सपकाळ, डॉ. नरेंद्र दाभोळकर, चैतन्य महाराज देगलुरकर, प्रसिध्द शास्त्रज्ञ डॉ. रमण गंगाखेडकर, डॉ. कुमार सप्तर्षी, सुरेश द्वादशीवार, डॉ. जगदीश हिरेमठ, पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने, माजी कुलगुरु डॉ. सुधीर गव्हाणे यांची व्याख्याने झाली आहेत . या वर्षी ०२ मे २०२६ रोजी सायंकाळी ०७:०० वा. देगलूर येथील नगरेश्वर मंदिर प्रांगण येथे आयोजित केला आहे. सर्व मान्यवरांनी या व्याख्यानमालेचा लाभ घ्यावा, असे आवाहन कै. नारायणराव चिद्रावार स्मृती व्याख्यानमालेच्या संयोजकांनी केले आहे.

# महाड येथील ऐतिहासिक चवदारतळे सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षानिमित्त काव्यसंग्रहासाठी कविता पाठवण्यास मुदतवाढ; प्रातिनिधिक कवितासंग्रहास उदंड प्रतिसाद

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

महाड येथील ऐतिहासिक चवदारतळे सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षानिमित्त ( २०२६ – २०२७ ), सार्थक साहित्य प्रकाशन यांच्या वतीने संपादक नवनाथ रणखांबे यांच्या संकल्पनेतून साकारत असलेल्या या विशेष प्रातिनिधिक काव्यसंग्रहास राज्यभरातील कवी – लेखकांकडून मिळालेल्या उदंड प्रतिसाद आणि विनंतीचा विचार करून, आता पुन्हा कविता पाठविण्याची शेवटची मुदत दि. १० मे २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. या प्रातिनिधिक कवितासंग्रहात दिग्गज नामवंत मान्यवरांच्या कविता कवितासंग्रहात वाचकांना वाचावयास मिळणार आहेत. या ऐतिहासिक काव्यप्रकल्पासाठी कवींनी समता, सामाजिक न्याय, मानवता, तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रेरणादायी जीवनकार्य, त्यांचे मौलिक विचार, विविध सत्याग्रह आणि विशेषतः महाडच्या चवदार तळ्याची क्रांती या विषयांवर आधारित आशयसंपन्न, विचारप्रवर्तक, माणूस जोडणाऱ्या आणि मानवतावादी कविता पाठवाव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे. प्राप्त झालेल्या कवितांमधून केवळ निवडक आणि दर्जेदार कवितांचीच निवड करण्यात येणार असून, कविता स्वतःची, मौलिक व अप्रकाशित असणे अनिवार्य आहे. तसेच, प्रथम सहभाग नोंदविणाऱ्या कवींना प्राधान्य दिले जाणार आहे. अधिक माहितीसाठी इच्छुकांनी प्रा. आशा रणखांबे (सार्थक साहित्य प्रकाशन) तसेच साहित्यिक नवनाथ रणखांबे ९९६७४३५०३२ / ९९६७४८०९३२ या क्रमांकावर संपर्क साधावा.




हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077